# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं ७६/२०१९

| | | |
|---|---|---|
| १. प्रा. अहिवळे अनिल अर्जून | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. रयत शिक्षण संस्था, सातारा<br>२. श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ | } | वि. प |

**तक्रारीचे स्वरूप :**

रयत शिक्षण संस्था, सातारा यांचे श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ यांचेकडील हिंदी विषयाचे शिक्षक श्री. अनिल अर्जून अहिवळे यांनी दिनांक १४/०८/२०१९ रोजी समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला होता.

मा.सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी पत्र क्रं. एच/ईडीएन/२६२१ दिनांक १७/०६/२०१९ नुसार श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ वरून आर.आर.पाटील महाविद्यालय, सावळज येथे बदली केली आहे. सदर बदली रद्द करावी या साठी अर्ज तसेच माझ्या वारंवार बदल्या केल्या जातात. नेमणूकीपासून आजपर्यंत १३ बदल्या झाल्या आहेत. सदरच्या वारंवार होणाऱ्या बदल्यामुळे माझे, मुलांचे नुकसान व मुलांच्या शिक्षणाची हेळसांड होते.

**संस्थेचा अभिप्राय :**

The Management states that Mr.A.A.Ahiwale was transferred on administrative ground for nine times & three times on his own request and convenience in Satara District. (The Management has given detailed say on separate page)

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

I the principal of Shripatrao Kadam college, Shirwal states that my Ld predecessor made report to Rayat shikshan Sanstha on 17/05/2018 that the work of shri A.A. Ahiwale is unsatisfactory. Therefore the management transferred him from Shirwal to Sawlaj by order H.EDN/2621/ dt.17/06/2019. He did not join there. He filed Writ.p.NO.7968/2019 to the Hon'ble High court, Bombay.

**समितीची निरिक्षणे :**

या प्रकरणी संस्थेतर्फे महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती मंजूषा बोबडे यांना संस्थेने अधिकार देऊन या प्रकरणी संस्थेचे म्हणणे मांडणेकरीता अधिकार दिले आहेत. या प्रकरणी प्राचार्य व संस्थेचे असे म्हणणे आहे की, तक्रारदार यांनी कर्तव्य बजावणीत कसूर केली आहे व त्यांनी त्यांच्या पदाची अनेक कार्य व्यवस्थित पार पाडलेली नाहीत जेणेकरून विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे तसेच त्यांची बदली सातारा जिल्हयात वेळोवेळी तक्रारदार यांचे कौटूंबिक अडचणीमुळे झाली असल्या कारणाने त्यांना बदली बाबत तक्रार करण्याचा अधिकार नाही व या आधी देखील त्यांच्या केलेल्या बदल्या या उच्च न्यायालयातील प्रकरणात तक्रारदाराच्या बदल्या संस्थेने मान्य केल्याने रद्द झाल्या आहेत. एखादा कर्मचारी त्याची कर्तव्ये व्यवस्थित बजावत नसेल व कामात चूकारपणा करत असेल तर त्याची बदली प्रशासकीय कारणास्तव करण्याचा अधिकार संस्थेचा आहे. त्यामुळे केलेली बदली ही संबधित प्राचार्य यांच्या अहवालाने केल्याने ती योग्य आहे व या बदलीत तक्रार निवारण समितीने हस्तक्षेप अपेक्षीत नाही. प्रकरण विचारार्थ घेण्या ऐवजी समिती हे नमूद करू इच्छीते की, तक्रारदाराने उच्च न्यायालय मुंबई येथे अर्ज केला होता व तो या समितीचे नव्याने गठण झाल्यावर पाठवण्यात आला. यातील अध्यक्षांनी २४/०९/२०१९ रोजी या प्रकरणी सुनावणी घेतली आहे.

समितीने दोन्ही बाजूंचे म्हणणे विचार पुर्वक ऐकले व तक्रारदारा विरूध्द् संस्थेची तक्रार असलेने समितीने अशी मागणी केली की, संस्थेने तक्रारदारास वेळोवेळी दिलेले कर्तव्य पालन न केलेबाबत दिलेले मेमो, नोटीसा, पत्रे इत्यादी या कार्यालयात दाखल करावीत व त्यांना कालावधी देऊन समिती समोर इतर प्रकरणांची चौकशी संपेपर्यत हजर करावी असे सांगीतले असता दरम्यानचे काळात प्राचार्या श्रीमती मंजूषा बोबडे यांनी फोनवर चौकशी करून कागदपत्रे संस्थेकडे मागणी केली परंतू तशी कागदपत्रे नसल्याचे संस्थेकडून त्यांना सांगण्यात आले. त्यांनी तसे या समितीसमोर कथन केले व तक्रारदाराने कर्तव्य बजावणीत कसूर केलेबाबत कोणतेही कागदपत्रे संस्थेत उपलब्ध नाहीत असे सांगीतले त्यामुळे संस्थेकडे त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दाच्या पूष्ठयार्थ कोणतेही दस्ताऐवज नाहीत असे आढळून आले व केवळ तोंडी अहवालांवरून बदली केली आहे असे संस्थेचे म्हणने आहे.

यावरून असे निर्दशनास येते की, तक्रारदारची बदली त्यानी कर्तव्य बजावणीत कसूर केलेबाबत तथाकथीत अहवालांवरून झाली आहे. न्यायाचे नैसर्गिक तत्व असे सांगते की, कोणाही व्यक्तिला शिक्षा देण्याआधी किंवा त्याच्या हिताविरूध्द् कारवाई करण्याआधी संबधित कर्मचाऱ्यास नोटीस देऊन खुलासा मागऊन त्याचे म्हणणे ऐकणे संस्थेस बंधनकारक होते. परंतू या महत्वपुर्ण नैसर्गिक न्यायाच्या तत्वाची या प्रकरणी सपशेल पायमल्ली केल्याचे निर्दशनास येते. संस्थेने या प्रकरणी आठ दस्ताऐवज यादीसोबत हजर केले. त्यामध्ये तक्रारदाराचे बदलीचे अर्जांचा समावेश आहे. या अर्जावरून असे निर्दशास येते की, अर्जदाराने त्याची बदली सातारा जिल्हयात करण्यात यावी असे नमुद केले आहे व त्यामध्ये त्याचे आई वडील आजारी आहेत, पति—पत्नि एकत्रीकरण, घरगुती कारण अशी कारणे दिलेली आहेत. त्यांच्या एकूण अर्जांचा विचार करता असे लक्षात येते की, त्याची कौटूंबिक अडचण योग्य असल्याने त्याची बदली सातारा जिल्हयात

करण्यात आली आहे. तसेच या अर्जा अंतर्गत करण्यात आलेली बदली कोणत्याही न्यायोचित अगर कोणत्याही योग्य प्रशासकीय कारणासाठी करण्यात आलेली आहे असे निर्दशनास येत नाही. करिता ही समिती खालील निर्णयाप्रत येत आहे.

## आदेश

तक्रारदार याची संस्थेने दिनांक १७/०६/२०१९ रोजी आर.आर. पाटील महाविद्यालय, सावळज येथे करण्यात आलेली बदली संस्थेने निर्णय मिळाल्या पासून सात दिवसाच्या आत रद्द करावी व तक्रारदार पुर्वी जेथे काम करत होता तेथे रूजू करून घेण्यात यावे. दरम्यानच्या काळात जर तक्रारदार सेवेत गैरहजर असेल तर त्याचे पगार व इतर सेवाशर्तीबाबत संस्थेस योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार असेल. झालेल्या निर्णयाच्या प्रती तक्रारदार, संबधितांना देण्यात याव्यात.

**दिनांक :** १८ ऑक्टोबर २०१९

18/10/19

**अध्यक्ष**
**(श्री. एस.पी.कुलकर्णी)**

**सदस्य**
**(श्री. ए.ए. कुलकर्णी)**

18/10/19

**सदस्य**
**(श्री. पी.डी. राऊत)**

18/10

**सदस्य**
**(श्री. व्ही. डी. नांदवडेकर)**

**सदस्य**
**(श्री.एन.बी.गायकवाड)**

**सदस्य सचिव**
**(श्रीमती ए.ए. कदम)**